ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

# भारतातील विधवांचे प्रमाण

**डॉ. सुनील केळकर**

*श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे ५२*

*ईमेल आयडी:* sunilykelkar@gmail.com

**गोषवारा**

*२१व्या शतकात स्त्री पुरुष समानतेच्या, महिला सक्षमीकरणाच्या अनेक गोष्टी बोलल्या जातात. मात्र आजही भारतासारख्या पुरुषप्रधान देशात स्त्रिया दुय्यम मानल्या जातात. विकास प्रक्रियेतील एक अतिशय महत्त्वाचा घटक म्हणून स्त्रियांकडे पाहिले जाते. मात्र याच घटकाकडे आवर्जून व जाणून बुजून दुर्लक्ष केले जाते. मुळातच भारतीय समाजात पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. मात्र विधवा स्त्रियांचे प्रमाण भारतात सातत्याने वाढत आहे. शहरी भागातच नव्हे तर ग्रामीण भागात देखील विधवांची संख्या वाढताना आढळते. भारताच्या वेगवेगळ्या राज्यामध्ये देखील विधवांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते. विधवांच्या संख्येत होणारी वाढ ही भारताच्या विकासाच्या दृष्टीने ही अतिशय गंभीर बाब आहे.*

**बीज संज्ञा** : *विधवा, स्त्रिया, भारत*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रस्तावना

वर्षानुवर्षे भारतीय समाजात स्त्रिया या अंधकारमय जीवन जगत आहे. पूर्वी स्त्रियांच्या बाबतीत स्त्रियांचे घटते प्रमाण, निरक्षरता, स्त्री भ्रूणहत्या, बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, अकाली वैधव्य अशा अनेक समस्या भारतीय समाजात अस्तित्वात होत्या. या समस्यांमुळे स्त्रियांना अनेक प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागला. आज केशवपन, सतीप्रथा यांसारख्या समस्या जरी नष्ट झाल्या असल्या तरीही भारतीय समाजात विधवांना समाजाकडून व कुटुंबांकडून फारसे संरक्षण मिळत नाही. या विधवा भारतीय समाजात पूर्णपणे वंचित व दुर्लक्षित जीवन जगतात. आजही त्यांना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. भारतात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. मात्र भारतात विधवांच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत आहे. त्याची वेगवेगळी कारणे आढळतात. म्हणून सदर शोध निबंधात भारतातील विधवा स्त्रियांच्या प्रमाणावर प्रकाश टाकला जाईल.

### शोध निबंधाची उद्दिष्टे

१) भारतातील विधवांच्या प्रमाणाचा आढावा घेणे.

२) भारतातील विविध राज्यांमधील विधवांची संख्या अधोरेखित करणे.

### शोध निबंधाची गृहीतके

१) भारतात विधवांचे प्रमाण अधिक आहे.

२) भारतात व भारतातील विविध राज्यांत विधवांच्या प्रमाणात वाढ होत आहे.

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

**माहिती संकलनाचे स्त्रोत**

सदर संशोधनासाठी दुययम साधन सामग्रीचा उपयोग केला आहे. वर्तमान पत्र, संदर्भ ग्रंथ, भारतीय जनगणना २०११ अहवाल, नियतकालिके, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

**विधवा**

जिचा पती निधन पावला आहे आणि जिने पुन्हा विवाह केलेले नाही अशी स्त्री म्हणजे 'विधवा' होय.

**भारतातील विधवांचे प्रमाण**

भारत हा पुरुषप्रधान देश आहे. या पुरुषप्रधान देशात स्त्रियांचा दर्जा हा नेहमीच कनिष्ठ मानला गेला आहे. भारतीय समाजात व कुटुंबात त्यांना फारसे महत्त्व दिले जात नाही. शिक्षण, आरोग्य, आहार, नोकरी अशा वेगवेगळ्या बाबींसाठी स्त्री व पुरुष असा भेद जन्मा पासून ते मृत्यूपर्यंत केला जातो. विकास प्रक्रियेत पुरुषाबरोबर स्त्री ही अतिशय महत्त्वपूर्ण असा घटक आहे. मात्र या घटकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून त्यांना प्रत्येक बाबींसाठी वंचित ठेवले जाते.

आज २१ व्या शतकातही भारतात मुलगी ही कुटुंबासाठी फार मोठे ओझे मानली जाते. म्हणूनच बहुतांश वेळेला मुलगी जन्माला येण्यापूर्वीच तिला मारले जाते. परिणामी भारतात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण खूप कमी असल्याचे आढळते. २००१ च्या जणगणनेनुसार भारतात १००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ इतके आहे. तर २०११ च्या जनगनणेत १००० पुरुषांमागे स्त्रियांची संख्या ९४३ इतकी होती. बालमृत्यूचे प्रमाण देखील मुलांपेक्षा मुलींचे अधिक आहे.

| राज्य | विधवा संख्या | विधवांचे प्रमाण |
|---|---|---|
| जम्मू काश्मीर | ३,३५,१३६ | 0.६२ |
| हिमाचल प्रदेश | ३७६०१९ | ०.६९ |
| पंजाब | ११८५९४३ | २.१९ |
| चंदिगढ | २९२१६ | ०.०५ |
| उत्तराखंड | ४६११८९ | ०.८५ |
| हरियाना | ९२४११५ | १.७० |
| दिल्ली | ५३९२३५ | ०.९९ |
| राजस्थान | २५८१३८८ | ४.७६ |
| उत्तरप्रदेश | ५९१३८०५ | १०.९१ |
| बिहार | २६०२३८० | ४.८० |
| सिक्कीम | १९६७६ | ०.०४ |
| अरुणाचल प्रदेश | ५६८२८ | ०.१० |
| नागालंड | ७४८८० | ०.१४ |
| मणिपूर | १०५७०५ | ०.१९ |
| मिझोरम | ५६२८० | ०.१० |
| त्रिपुरा | २३४११६ | ०.१३ |

ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

| | | |
|---|---|---|
| मेघालय | १५६८९९ | ०.२९ |
| आसाम | १३६९०११ | २.५२ |
| वेस्ट बंगाल | ४९९०११६ | ९.२० |
| झारखंड | १४९०३१८ | २.७५ |
| ओडीसा | २३०६४१६ | ४.२५ |
| छत्तीसगड | १४२५३५१ | २.६३ |
| मध्यप्रदेश | २९३८९९१ | ५.४२ |
| गुजरात | २४५२५१८ | ४.५२ |
| दमन आणि दिव | ७९३६ | ०.०१ |
| दादरा नगर हवेली | १३११७ | ०.०२ |
| महाराष्ट्र | ५५२१२९० | १०.१८ |
| आंध्रप्रदेश | ५२७१९४१ | ९.७२ |
| कर्नाटक | ३७१९२३६ | ६.८६ |
| गोवा | ८९८९४ | ०.१७ |
| लक्षद्वीप | ४८७३ | ०.०१ |
| केरळ | २२४२१७४ | ४.१३ |
| तामिळनाडू | ४६२९०९४ | ८.५४ |
| पोन्डेचरी | ८५९८३ | ०.१६ |
| अंदमान निकोबार | १३४९१ | ०.०२ |
| एकूण भारत | ५४२२४५६३ | -- |

**स्त्रोत :- भारतीय जनगणना २०११**

भारतात अनेक ठिकाणी आजही मुलींचे विवाह लहान वयातच केले जातात. त्याचे प्रमुख कारण म्हणजे पारंपरिक मानसिकता, दारिद्र्य, निरक्षरता, पुरुषप्रधान संस्कृती इत्यादी. २००१ ते २०११ च्या काळात भारतात विधवा स्त्रियांच्या संख्येत फार मोठी भर पडली आहे. भारतातील विविध राज्यातही विधवांच्या संख्येत भिन्नता आढळून येते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ५ कोटी ४२ लाख चोवीस हजार पाचशे त्रेसष्ट विधवा स्त्रिया आहेत. भारतात सर्वात जास्त विधवांचे प्रमाण उत्तर प्रदेशात असून त्यांची आकडेवारी सुमारे ५९,१३,८०५ इतकी आहे व हे प्रमाण १०.९१ % आहे. उत्तरप्रदेशा खालोखाल २रा नंबर महाराष्ट्राचा असून महाराष्ट्रातील विधवा स्त्रियांची संख्या ५५,२१,२९० इतकी असून एकूण टक्केवारी पैकी १०.१८ % आहे . उत्तरप्रदेश महाराष्ट्रयाच्या खालोखाल आंध्रप्रदेश, तामिळनाडू , पश्चिम बंगाल या राज्यात विधवांचे प्रमाण भरपूर आहे .भारताच्या लोकसंखेचा व प्रादेशिक आकाराचा विचार केला तर असे आढळून येते की वरील उल्लेख केलेल्या राज्यात लोकसंख्या जास्त असून तिथे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते . स्त्रियांची शैक्षणिक प्रगती मध्ये कमी सहभाग , गरिबी, आजारांचे प्रमाण जास्त, या व अशा सामाजिक आर्थिक घटकामध्ये मागासलेपणा त्यामुळे हे प्रमाण जास्त आढळते भारतातील सर्वात कमी विधवांची संख्या लक्षद्वीप (०.०१%),

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

दमण दिव (०.०१%), दादरा नगर हवेली (०.०२%), पोन्डेचरी (०.१६%), अंदमान निकोबार (०२%), व गोवा येथे (१७%) आढळते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात १.८४ लाख इतक्या बाल विधवा आहेत.

२०१५ मध्ये लुम्बा संस्थेने विधवा स्त्रियांच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी जागतिक पातळीवर एकूण २४ देशांचा अभ्यास केला व जगभरातील विधवांच्या स्थिती संदर्भात अहवाल प्रसिद्ध केला. सदर अहवालात लुम्बा संस्थेने वेगवेगळ्या वयोगटातील विधवांची टक्केवारी निदर्शनास आणून दिली. लुम्बा संस्थेच्या अहवालानुसार जागतिक पातळीवर विधवांच्या स्थितीत व स्थानात फारसा बदल झालेला आढळून येत नाही. त्यांना अनेक तऱ्हेने सामाजिक, आर्थिक, मानसिक, शारीरिक व कौटुंबिक कलहाला सामोरे जावे लागते. असे या संस्थेने स्पष्ट केले. या संस्थेने केलेल्या अभयासानुसार विधवांची वाईट परिस्थिती व विधवांच्या वाढत्या संख्येबाबत भारत हा जागतिक पातळीवर दुसऱ्या क्रमां◌ंकाचा देश आहे. भारतात सैनिकांची विधवा असो, शेतकऱ्याची विधवा असो, ग्रामीण विधवा असो शहरी विधवा असो, तरुण विधवा असो किंवा वृद्ध विधवा असो कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, भावनिक अशा अनेक स्तरांवर त्यांना भेदभावाचा सामना करावा लागतो. समाजात विधवा स्त्री म्हणून जगत असताना त्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

आजही भारतात या विधवा स्त्रियांच्या स्थितीत आणि प्रश्नांमध्ये फारसा फरक पडलेला आढळून येत नाही. जगातील अनेक देशांमध्ये विधवा स्त्रियांचे प्रमाण हे विधुरांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते आले आहे. विधुर पुरुषांच्या तुलनेत विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण भारतीय समाजात कमी आहे. त्याचे कारण म्हणजे -

१. विधवा स्त्रियांच्या मुलांच्या व कौटुंबिक जबाबदाऱ्या.

२. भारतीय समाजातील प्रथा परंपरा व चालीरितींचे निर्बंध.

३. विधवा स्त्रियांशी पुनर्विवाह करण्यास भारतीय पुरुष उत्साही नाही.

४. भारतीय समाजात विधवांकडे पाहण्याचा दूषित दृष्टिकोन.

५. वैधव्य हा त्या स्त्रीचा दोष मानून तिला कौटुंबिक, सामाजिक सुखांपासून वंचित ठेवण्याची वृत्ती.

वर्षानुवर्षे विधवांना भारतीय समाजात वंचित जीवन जगावे लागत आहे. आजही त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीत फारसा काही बदल झालेला दिसून येत नाही. बहुतांश वेळेला कुटुंबातून देखील त्यांचा स्वीकार देखील केला जात नाही. समाजाकडूनही त्यांना भेदभावाची वागणूक मिळते. भारतातील विविध राज्यातही विधवांची स्थिती सारखीच आढळते.साहजिकच या एकाकी निराधार विधवा स्त्रियांचे प्रमाण भारतीय समाजात अधिक आहे.

**निष्कर्ष**

भारतात लोकसंखेचां अभ्यास करत असतांना प्राचीन काळापासून विधवा समस्या मोठ्या प्रमाणावर आढळूण येतात . बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, अकाली वैधव्य यांसारख्या अशा अनेक समस्या भारतीय समाजात प्राचीन काळापासून अनिष्ट रूढींशी निगडित असल्याने, मानवतेच्या व नैतिकेच्या दृष्टिकोणातून विधवा स्त्रियांच्या समस्या हाताळणे आवश्यक होते. त्या दृष्टीने एकोणिसाव्या शतकात काही पुरोगामी विचारांच्या नवशिक्षित सुधारकांकडून समाजसुधारणांचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. या रूढीतील अशास्त्रीयता पटवून देण्यासाठी व्यंकटेश रंगो कट्टी यांनी विधवावपन-अनाचार हे पुस्तक लिहिले. लोकहितवादी, आगरकर यांनीही ही रूढी नष्ट व्हावी म्हणून आवाज उठविला. सतीच्या अमानुष चालीविरूद्ध भारतात चळवळ उभी राहिली. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी या चालीच्या विरोधात जे प्रयत्न केले, त्यांच्या परिणामी गव्हर्नर

ISSN–2277- 8721

OPEN ACCESS

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंकच्या कारकीर्दीत १८२९ साली कायद्याने सतीच्या चालीवर बंदी घालण्यात आली.

विधवांच्या पुनर्विवाहाबाबत या काळात अनेक समाजसुधारकांनी चळवळ सुरू केली. १८५५ मध्ये बंगालमध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवाविवाहाची मागणी करणारा अर्ज सरकारकडे पाठविला. तसेच त्यांनी पुनर्विवाहाच्या पुष्ट्यर्थ ग्रंथही लिहिला या ग्रंथात विधवाविवाहाला पाठिंबा देणारे दाखले धर्मशास्त्रातूनच काढून दाखवले आहेत. या ग्रंथाचे मराठी भाषांतर विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांनी विधवाविवाह या नावाने १८६५ मध्ये केले. ते स्वतःकर्ते समाजसुधारक होते व त्यांनी विधवेशी विवाह केला होता. १८५६ मध्ये हिंदू विधवा पुनर्विवाहाचा अधिनियम मंजूर झाला. बालविवाहाला विरोध करणे व विवाहाचे वय वाढविणे यांकरिता बंगालमध्ये व महाराष्ट्रात प्रयत्न सुरू झाले. महाराष्ट्रात जगन्नाथ शंकर शेट, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी प्रभृतींनी या कार्यास वाहून घेतले. १८६५ साली मुंबईत ‘विधवाविवाहोत्तेजक मंडळा’ ची स्थापना झाली. या सभेत महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी, काशिनाथ त्र्यंबक तेलंग यांसारखी मातब्बर मंडळी होती. गो. ग. आगरकरांनीही विधवांच्या पुनर्विवाहाचा हिरिरीने पुरस्कार केला. पुनर्विवाहाच्या कार्यातही महत्त्वपूर्ण योगदान महाराष्ट्रातील पहिले भारत रत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १८९३ मध्ये त्यांनी बालविधवेशी विवाह केला व सनातनी लोकांचा रोष ओढवून घेतला. १८९० मध्ये ‘विधवाविवाहोत्तजक मंडळी’स्थापन करण्यात आली. या संस्थेचे १८९५ मध्ये ‘विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळी’ असे नामांतर झाले. या मंडळीचे अध्यक्ष रा. गो. भांडारकर होते. विधवाविवाहाबरोबरच स्त्रीशिक्षणास समाजात प्राधान्य मिळावे, यासाठी लोकजागृतीचे प्रयत्न महर्षी कर्वे व महात्मा फुले यांनी केले. १९०० मध्ये महर्षी कर्वे यांनी हिंगणे येथे विधवांसाठी आश्रम स्थापन केला.

**संदर्भ**

1. Altekar, A. S. *The Position of Women in Hindu Civilization*, Delhi, 1962.
2. Chatterji, Shoma, *the Indian Women in Perspective*, Delhi, 1993.
3. Dandavate, Pramila Ranjana kumari Varghese, Jamila, Widows, Abandoned and Destitute Women in India, Delhi, 1989.
4. Sharma, Vijay, *Protection to Women in Matrimonial Home*, Delhi, 1994.
5. मालशे, स. गं. आपटे, नंदा, विधवा विवाह चळवळ (१८००-१९००), मुंबई, १९७८.
6. विद्यासागर, ईश्वरचंद्र अनुपंडित, विष्णु परशुरामशास्त्री, विधवा विवाह, मुंबई, १८६५.
7. कुलकर्णी, मा. गु. केसकर, यांचे वर्तमानपत्रातील लेख

*Cite This Article:*

**डॉ. सुनील केळकर,** *(2022). भारतातील विधवांचे प्रमाण*, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 181-185.*